महाराष्ट्र शासन

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि. रत्नागिरी (मु.)चिपळूण यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र.०२३५५-२५६१०७/पिनकोड नं -४१५६०५/ई-मेल आयडी ddcahratnagiri@gmail.com

## जाहीरात निविदा सूचना

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा रत्नागिरी, मु.चिपळूण या कार्यालया अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जि.रत्नागिरी, मु.चिपळूण या कार्यालयासाठी महाराष्ट्रातून कुठल्याही ठिकाणाहून **दिनांक ०१/०३/२०२५** ते **दिनांक २८/०२/२०२६** या कालावधी करिता व त्यापुढील नविन भावबंदकरार होईपर्यंत द्रवनत्र पात्रांमधून निर्देशित ठिकाणाहून द्रवनत्र भरुन ते रत्नागिरी जिल्यातील पशुवैद्यकिय संस्थाना पुरवठा करणेकरिता व लस, औषधे, ठोंब, टॅग इ. गरजेनुसार सांगण्यात येईल. अशा शासकिय कामाकरिता इच्छुक वाहन कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा फॉर्म कार्यालयामध्ये प्राप्त होतील.(फॉर्मची किंमत रु. ७५०/-)

सदर निविदा प्रपत्रे अटी व शर्ती इत्यादी बाबत सविस्तर माहिती शासनाच्या **https://ahd.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्दीकरिता देण्यात आली असून संपुर्ण निविदा या संकेत स्थळावरून करण्यात यावी. **दिनांक २१/०१/२०२५** ते **दिनांक ०४/०२/२०२५** प्राप्त निविदा संभवतः **दिनांक ०७/०२/२०२५** रोजी **दुपारी १५:००** वाजता उघडण्यात येतील. प्राप्त निविदा पैकी एखादी अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार निविदा समितीकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

(डॉ.द.श्री.सोनावले)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
जि.रत्नागिरी (मु.) चिपळूण

Scanned with ACE Scanner

## निविदा फार्म सादर करणेसाठी पद्धत.

**लिफाफा नं.-** १ या मध्ये शर्ति व अटीची पूर्तता करुन वाहनाची साक्षांकित केलेली सर्व कागदपत्रे झेरॉक्स प्रतीमध्ये सादर करावेत. वाहनाची मूळ कागदपत्रे निविदा उघडण्याचे वेळेत सोबत आणावी. लिफाफा नंबर १ मधील खालील तांत्रिक कागदपत्रे (अटी व शर्तीची)

१. वाहनाचा प्रकार व क्षमता - सर्वसाधारण टॅम्पो टाटा-७०९ (सहाचाकी) इतक्या क्षमतेचे वाहन किंवा त्या पुढील क्षमतेचे वाहन
२. वाहन चालकाचा परवाना पत्र व क्रमांक
३. वाहन रजिस्टर क्रमांक व दिनांक या बाबत आवश्यक ते कागद पत्र
४. वाहतूक ठेकेदाराची पॅनक्रमाक
५. वाहनाचा विमा
६. वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट

**लिफाफा नं.- २ व्यापारी लिफाफा -सदर लिफाफामध्ये ठेकेदाराने आपल्याकडील दर नमूद करावेत.**

**सर्वसाधारण माहिती व अटी शर्ती :-**

१. सदर निवीदा जिल्हास्तरीय खरेदी समितीच्या उपस्थितीत दिनांक ०७/०२/२०२५ रोजी उघडण्यात येतील. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक व वेळेत बदल होऊ शकतात.

२. निवीदा मंजुर झाल्यास मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा रत्नागिरी, मु.चिपळूण यांचे नावे पोस्ट ठेवी योजने अंतर्गत रुपये २५,०००/- ची सुरक्षा ठेव म्हणुन जमा करणे बंधनकारक राहील.

३. द्रवनत्र घेवून ते रत्नागिरी जिल्यातील १५३ पशुवैद्यकिय संस्थाना पुरवठा करणेसाठी वाहतूक करणे.

४. पशुखादय, लसीची खोकी व इतर शासकिय साहित्याची आवश्यक तेव्हा वाहतूक करणे.

५. महिन्यातून अंदाजे **२००० ते २५०० कि.मी.** पर्यंत वाहतूक राहील यात शासकिय गरज व सूचनाप्रमाणे अंतर कमी जास्त होईल.

६. रिकामे/भरलेले द्रवनत्र उत्पादक कंपनीमध्ये तसेच जि.रत्नागिरी (चिपळूण) मुख्यालयी व पशुवैद्यकिय संस्थाना पुरवठा करताना द्रवनत्र पात्राची चढउतार करण्याची संपूर्ण कामे वाहतूक ठेकेदारानी करावयाची आहे.

७. ठेकेदारानी वाहतुकीचा दर प्रती कि.मी. प्रमाणे देणेचा आहे.

८. उत्पादक कंपनीमध्ये द्रवनत्र ताब्यात मिळेपर्यंत थांबावे लागेल. प्रसंगी तेथे या पशुवैद्यकिय संस्थाना पुरवठा करताना मुक्काम करावा लागेल.

१०. सदर वाहतूक करताना कोणतेही प्रकारचे दर देय राहणार नाही.

११. वाहनास हुड असणे आवश्यक असून तळाला रबर/फोम मॅटिंग असणे आवश्यक आहे.

१२. वाहनाचे क्षमता एकावेळी टी.ए.-५५ ची ४० द्रवनत्र पात्रे मावतील इतकी असणे आवश्यक आहे.

Scanned with ACE Scanner

१३. ठेकेदारास द्रवनत्र पात्राची वाहतूक ठरल्यावेळी न चुकता नियमितपणे करावी लागेल तसे न केल्यास वाहतूकीचा खर्च ठेकेदारास प्रचलित बाजारभावाने द्यावा लागेल किंवा भावबंद करारापेक्षा जादा झालेला ठेकेदारांकडुन वसूल केला जाईल.

१४. भाडोत्री वाहनाच्या ठेकेदाराने निविदा उघडणेची दिवशी निविदेमध्ये नमुद केलेल्या वाहन क्रमांकाचे वाहन कार्यालयास मूळ कागदपत्रासह पहाणीसाठी आणणे बंधनकारक राहिल.

१५. वाहन शासकीय कामावर असताना त्या वाहनामध्ये इतर माल वाहून नेता येणार नाही.

१६. भाडोत्री वाहन ठेकेदाराचे काम व्यवस्थित होत नसल्याचे व आदेशाचे पालन होत नसल्याचे आढळून आल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि.रत्नागिरी (मु.) चिपळूण यांनी संबंधित ठेकेदाराची मुदत रद्द करुन अनामत रक्कम शासनाकडे जमा करण्याचे हक्क राखून ठेवले आहेत.

१७. खात्याच्या अत्यावश्यक सेवेतील बाब असल्याने भाडोत्री वाहन ठेकेदारानी मुदत संपल्यावर नविन निविदा मंजूर होईपर्यंत त्यांनी पहिल्याच दराने व अटी व शर्तीच्या अधिन राहून द्रवनत्र व इतर साहित्यांची वाहतूक करावयाची आहे.

१८. वाहतूकीपोटी ॲडव्हान्स दिला जाणार नाही. इंधनाची व्यवस्था ठेकेदाराने स्वतः करावयाची आहे.

१९. ठेकेदार हा द्रवनत्र ताब्यात मिळालेपासून परत रिकामी द्रवनत्र पात्रे झाकणासह केंद्रातील अधिका-यांच्या ताब्यात देईपर्यंत द्रवनत्र पात्राच्या होणा-या नुकसानीस ठेकेदार जबाबदार राहील. तसेच योग्यप्रकारे द्रवनत्र पात्राची हाताळणी करणेची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२०. वाहतुकीत वाहनाच्या झालेल्या नुकसानीस तसेच बरोबर असलेल्या कार्यालयाच्या प्रतिनिधीस इजा झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२१. वाहतुकीच्या आगाऊ दिलेल्या कार्यक्रमानुसार सुस्थितीतील वाहन, वाहनचालक, वाहक इ. वाहतुकीसाठी वेळेवर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२२. शासकिय वाहतूकीत अडथळा निर्माण होवू नये म्हणून ठेकेदारानी आपले वाहन कायम सुस्थितीत ठेवावे. वाहनाच्या दुरुस्तीचा सर्व खर्च ठेकेदारास स्वतः करावा लागेल. वाहनासंबंधी सर्व मूळ कागदपत्रे अद्यावत ठेवणेची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२३. निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराकडून त्याचे बिलामधून रु.२ टक्के प्रमाणे नियमित आयकर वसूल केला जाईल.

२४. दर निश्चित असतांना जर दोन किंवा तीन ठेकेदाराचे दर सारखे आले तर, वाहनाचा प्रकार, वाहतूक करण्याची क्षमता पाहून समिती अंतिम निर्णय घेईल व तो निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

२५. कोणतेही कारण न देता निविदापत्रके स्विकारणे अथवा नाकारणे वा रद्द करण्याचे अधिकार / हक्क समितीने राखून ठेवले आहे.

२६. सध्याचे मार्गात तसेच मुक्कामात शासकिय काटकसरीच्या धोरणाप्रमाणे बदल वाढ-कमी केल्यास त्या प्रमाणे ठेकेदारास अंमलबजावणी करावी लागेल.

२७. एकदा ठरवून दिलेल्या वाहतूकीच्या दरात कोणत्याही कारणाने वाढ करण्यात येणार नाही.

Scanned with ACE Scanner

महाराष्ट्र शासन
## जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि. रत्नागिरी (मु.)चिपळूण यांचे कार्यालय
दुरध्वनी क्र.०२३५५-२५६१०७/पिनकोड नं -४१५६०५/ई-मेल आयडी ddcahratnagiri@gmail.com

# निविदा सूचना

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा रत्नागिरी, मु.चिपळूण हे महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जिल्हा रत्नागिरी, मु.चिपळूण व इतर पशुवैद्यकिय संस्थाना लागणारे द्रवनत्र,लसी,बियाणे,पशुपक्षी,पशुखादय,इत्यादींची वाहतुक करणेकरीता निविदा योग्य त्या कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पद्धतीने मागविणेत येत आहे. तरी सदर निविदा बाबत माहिती **https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | टेंडर फि | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, मु.चिपळूण, जि.रत्नागिरी व इतर पशुवैद्यकिय संस्थाना लागणारे द्रवनत्र,लसी,बियाणे,पशुपक्षी, पशुखादय इत्यादींची वाहतुक करणे | १०,००,०००/- (मर्यादेत) | ७५०/- | १०,०००/- |

### निविदा कालावधी १ वर्ष दिनांक ०१/०३/२०२५ ते दिनांक २८/०२/२०२६

| अ.क्र | तपशील | दिनांक | | वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | पासून | पयंत |
| १ | संकेतस्थळावर निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | २१.०१.२०२५ | ०४.०२.२०२५ | १०:०० | १७:०० |
| २ | निविदा भरणेचा कालावधी | २१.०१.२०२५ | ०४.०२.२०२५ | १०:०० | १७:०० |
| ३ | निविदापूर्व सभा स्थळ, वेळ | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि.रत्नागिरी, मु.चिपळूण | | | |
| ४ | निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक :- ०४.०२.२०२५ | | वेळ :- १७:०० | |
| ५ | निविदा उघडणेची वेळ व दिनांक | दिनांक :- ०७.०२.२०२५ | | वेळ :- १५:०० | |
| ६ | निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | १) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, मु.चिपळूण, जि.रत्नागिरी<br>२) स.आ.प.सं., जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कार्यालय-चिपळूण, जि.रत्नागिरी<br>३) पशुधन विकास अधिकारी, जि.कृ.रे.केंद्र, मु.चिपळूण, जि.रत्नागिरी<br>४) महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, रत्नागिरी<br>५) लेखाधिकारी,जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी | | | |

(डॉ.द.श.सोनावले)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
जि.रत्नागिरी (मु.) चिपळूण

Scanned with ACE Scanner